आम्ही
# पार्लेकर
१९९१ पासून
प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३१ वे अंक दहावा पृष्ठे १२ ऑक्टोबर २०२२ www.parlekar.com
Registered-RNI no. 54781/92

या अंकात

पान ०२ बॉम्बे युनिव्हर्सिटी कॉम्प्लेक्स
पान ०३ अमेरीकेतील बी एम एम मध्ये पार्ल्याची पताका
पान ०७ होनी बाय
पान १० हॅन्सीएँटीक संघ



पान ५ नृत्य हेच जीवन

सौ. वैशाली धनेश पोतदार

# प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचा २५ वा वर्धापनदिन दिमाखात साजरा

डॉ. रमेश यशवंत प्रभू यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाला या ऑक्टोबर महिन्यात २५ वर्षे पूर्ण झाली. संकुलाचा रौप्य महोत्सवी वर्षाचा सोहळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा झाला.

'प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाच्या माध्यमातून अनेक होतकरू तरुण क्रीडापटू घडत आहेत ही अभिमानास्पद बाब आहे. यामुळे राज्याचा नावलौकिक वाढत आहे. या संकुलासाठी शासनाकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल' असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आश्वासन दिले.



यावेळी आमदार पराग अळवणी, प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे अध्यक्ष श्री. अरविंद प्रभू, सचिव डॉ मोहन राणे, विश्वस्त श्री. राजू रावळ, श्री. मकरंद येदूरकर, डॉ राम प्रभू, लीना प्रभू, राणी त्रिवेदी तसेच संकुलाचे पदाधिकारी यांच्यासह अनेक प्रशिक्षक, क्रीडापटू उपस्थित होते.

यावेळी विविध क्रीडा प्रशिक्षक व खेळाडूंना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

'डॉ प्रभूंनी २५ वर्षांपूर्वी लावलेल्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झाले आहे. या कामी क्रीडा संकुलाचे अध्यक्ष श्री अरविंद रमेश प्रभू यांचा खूप मोठा सहभाग आहे. त्यांनी संकुलात जगभरातील क्रीडा विषयक साधनसामग्री क्रीडापटूंना उपलब्ध करून दिल्या आहेत. दिवसाचे चौदा चौदा तास अविरत काम करून ते खेळाडूंपुढे आदर्श उभा करत आहेत' असे विश्वस्त राजू रावळ यांनी सांगितले.

या कार्यक्रमाच्या वेळी गेल्या २५ वर्षात वाढलेल्या जवळपास २४ ते २५ खेळांची उपस्थितांना माहिती करून देण्यासाठी व्हिडिओ क्लिप दाखविण्यात आली. तसेच या सोहळ्यात सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन यशोधन देशमुख व मनीषा कुलकर्णी यांनी केले.



**विमानतळाशेजारील मेट्रो स्थानकास डॉक्टर रमेश प्रभू यांचे नाव देण्याची अपेक्षा यावेळी प्रभू कुटुंबीयांनी व्यक्त केली.**



## संपादकीय

'पुणे तिथे काय उणे?' ही उक्ती पार्ल्याला सुद्धा लागू पडते. काय नाही आपल्या पार्ल्यात? शिक्षणाची उत्तम सोय, सभ्य, पापभिरू, शांतताप्रेमी, सुसंस्कृत समाज, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांची रेलचेल, आणि हो, हाकेच्या अंतरावर रेल्वे स्टेशन आणि विमानतळ. काही पार्ले वेडे त्यात 'हमारे पास (भेळवाला) शर्मा है' किंवा 'हमारे पास (वडावाला) बाबू है' अशीही भर घालतील. ह्यातील विनोदाचा भाग सोडला तरी पार्ले हे एक परिपूर्ण, स्वयंपूर्ण उपनगर आहे ह्यात काहीच दुमत होण्याचे कारण नाही. उगाच नाही मुंबईभरचे आणि बाहेरचेही मराठी लोकं पार्ल्यात घर घेण्याचे स्वप्न उराशी बाळगून असतात!

मित्रांनो, ह्याला एक दुसरी बाजू देखील आहे. जगभरात आणि आपल्या देशात सुद्धा श्रीमंत आणि गरीब ह्यांतील दरी वाढत चालली आहे. 'आहे रे' आणि 'नाही रे' ह्यांच्यातील संघर्ष पूर्वापार चालत आलेला आहे पण आज तो अत्यंत विदारक स्वरूपात समोर येत आहे. शनिवार रविवारी पार्ल्यातील हॉटेले, पब्स ओसंडून वहात असतात. कपड्यांचा व इतर चीजवस्तूंचा बाजार तर वर्षभर फुललेला असतो. पार्ल्यातील प्रत्येक बँक आपले आर्थिक लक्ष्य ओलांडून पुढे जात आहे. पण ह्या सुखवस्तू, चंगळवादी समाजाच्या पलीकडे सुद्धा आपल्या पार्ल्यात असा एक समाज आहे जो जगण्याशी संघर्ष करतो आहे, अर्धवट शिक्षण, म्हणायला नोकरी व त्यामुळे वाट्याला आलेले निम्नस्तराचे जगणे. पार्ल्यातील अभिरुचीपूर्ण कार्यक्रमांशी ह्याचे काही देणेघेणे नाही. महिन्याचा खर्च भागवण्यातच त्याची पुरती दमछाक होते. काही आजारपण आले तर सरकारी हॉस्पिटलमध्ये ओळख नसल्याने जागा मिळत नाही आणि खाजगी दवाखान्याचा खर्च परवडत नाही. पार्ल्यातील व आजूबाजूच्या अनेक वाड्यांत, वस्त्यांत हा समाज पसरला आहे पण त्याच्याकडे कोणाचेच लक्ष जात नाही. एका अर्थी आपण त्यांचे अस्तित्वच नाकारतो म्हणा ना!

आज आमच्या सामाजिक संस्थांच्या कार्यक्रमांना गर्दी होत नाही कारण आमच्या नवीन पिढीला इतर अनेक आकर्षणे आहेत. त्यांना आपले सांस्कृतिक कार्यक्रम 'outdated' वाटतात. खरे म्हणजे ह्या संस्थांची गरज आहे 'नाही रे' समाजाला. शिक्षणाचे महत्व पटवणे, वैद्यकीय मदत पुरवणे, त्यांच्या मुलांमधे नोकरी मिळवण्याची योग्यता निर्माण करणे, व्यसनाधिनता कमी करणे, ह्या समाजात असे अनेक उपक्रम राबवण्याची गरज आहे. श्रीमंतांच्या मनोरंजनाचे चोचले पुरवण्यापेक्षा गरीबाच्या दोन वेळच्या मीठ भाकरेसाठी आपण काही मदत करू शकलो तर त्याचे महत्व नक्कीच जास्त आहे. आमच्या सामाजिक संस्था ह्या वास्तवाकडे लक्ष देतील काय?

आम्ही पार्लेकर

संपादक
ज्ञानेश चांदेकर

संपादकीय सहाय्य
रश्मी मावळंकर
अवंती मांडवकर
editorial@parlekar.com

जाहिरात व्यवस्थापन
भावेश शिंदे
marketing@parlekar.com

सजावट व मांडणी
विश्वास महाशब्दे – अेस ग्राफिक्स

निर्मिती
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई–४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई–मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

# बॉम्बे युनिव्हर्सिटी कॉम्प्लेक्स

आज मुंबई विश्वविद्यालयाचे संकुल पश्चिम उपनगरातील कलीना भागात हलवले गेले असले



तरी मूलत: फोर्ट भागात वसलेले जुने संकुल आजही शहराचे भुषणच आहे.

या जुन्या संकुलात शिरतानाच सुंदर उद्यान असून त्यानंतर वाचनालय व पदवीदान समारंभाचे सभागृह आहे. त्याशिवाय प्रशासकीय विभाग व लागूनच उभा असलेला राजाबाई टॉवर या वास्तू सर गिल्बर्ट स्टॉक या ब्रिटिश वास्तुविशारदाने डिझाइन केल्या आहेत. तेराव्या शतकातील फ्रेंच शैलीत बांधलेले पदवीदान सभागृह सर कासवजी जहांगीर यांच्या उदार देणगीतून उभारलेले आहे. १८६९ ते १८७४ या काळातील हे बांधकाम कुर्ला व पोरबंदर जातीच्या दगडात केलेले आहे. भव्य कमानी, गोलाकार स्टेंट ग्लास खिडक्या, तीन बाजूला सुडौल गॅलरीज (सज्जा), सज्जांना सुरेख रेखीव लोखंडी ब्रॅकेट्सचा आधार हे सर्व काम नजरेत भरणारे आहे. उत्तरेकडील टोकाला बारा राशींच्या चिन्हांची चित्रे दिसतात. मुख्य सभागृह १०४ फूट लांब व ४४ फूट रुंद व ६३ फूट उंच आहे.

इथल्या वाचनालयात दुर्मिळ हस्तलिखिते, नकाशे, पुस्तके, पोथ्या, ग्रंथ यांचे भंडारच सामावलेले आहे. 1878 साली बांधलेले वाचनालय व लगतचा 180 फूट उंच राजाबाई टॉवर यांची उभारणी श्री. प्रेमचंद रॉयचंद यांच्या निधीतून झाली. त्यांनी या टॉवरला त्यांच्या मातोश्रींच्या पुण्यस्मृतीला वंदन म्हणून राजाबाई टॉवर नाव दिले. टॉवरच्या पहिल्या मजल्यावरील सज्जाच्या 15 फुटावर अष्टभुजाकृती कोनाडे कोरलेले असून त्यात पश्चिम हिंदुस्थानातील विविध जमातींच्या प्रातिनिधीक पेहरावातील पुतळे कोरलेले आहेत. जेथे घुमटाला सुरुवात होते तेथेही इतर शिल्पाकृती कोरल्या असून घुमटाच्या आधार देणाऱ्या खांबावरील शिल्पाकृती स्थानिक इंजिनियर मुकुंद रायचंद यांनी घडवलेल्या आहेत.

वाचनालयाच्या प्रवेशद्वाराच्या पायऱ्यांवर टाऊन हॉल सारखेच बेंच मार्क दिसतात. तळमजल्यावर दोन खोल्या, दिवाणखाना व जिन्याखाली बोळवजा जागा आहे. तेथे महाकवी होमर व नाटककार शेक्सपियर यांचे चेहरे कोरले आहेत. दगडी गोलाकार जिन्यावर व वाचन कक्षात सुंदर गोलाकार स्टेंट ग्लास खिडक्या दिसतात. इथली तक्तपोषी (सीलिंग) सागवानी लाकडाची आहे. अनेक प्रख्यात लोकांचे अर्ध पुतळे तेथे ठेवलेले आहेत. राजाबाई टॉवरवरील मोठे घड्याळ वेस्टमिनिस्टर घड्याळाप्रमाणेच टोले देते. पण यातील कॅरीलोना घंटा समूह व 'गॉड सेव द क्वीन' या गाण्याचे संगीत गेले अनेक वर्षे नादुरुस्त अवस्थेत आहे.

मंचरजी मर्झबान या वास्तुविशारदाने युनिव्हर्सिटीच्या बगीच्याची आखणी केली. यात सुरेख पुतळे व देखणे वृक्ष आहेत. सर कासवजी जहांगीर, प्रिन्सर डॉकची उभारणी करणारे थॉमस आर्मिस्टन यांचेही पुतळे येथे विराजमान आहेत. विद्यापीठ म्हणून आज या वास्तुचे महत्त्व कमी झाले असले तरी उत्तम वास्तुरचनेचा नमुना म्हणून आजही सदर इमारत फोर्ट विभागात डौलाने उभी आहे.



संगीता बेहेरे
९८६७७५८३१०
(फोर्टमध्ये फिरताना - भालचंद्र हर्डीकर)

### नागरीक दक्षता शाखेतर्फे पदयात्रा

लोकमान्य सेवा संघाच्या नागरिक दक्षता शाखेतर्फे वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवले जातात. दोन ऑक्टोबरला गांधीजयंती निमित्त ह्या शाखेतर्फे 'थुंकीमुक्त पार्ले' व 'प्लास्टिक पिशवीला नाही म्हणा' हे विषय घेऊन एक पदयात्रा काढण्यात आली होती. संध्याकाळी ५ वाजता स्टेशन समोरून निघून ही पदयात्रा पार्लेश्वर मंदिरासमोर संपली. शाखेच्या पदाधिकाऱ्यांसह अनेक पार्लेकर यात सहभागी झाले होते.

## दिवाळी पहाटमध्ये 'हमारे मुकेश'

अरविंद मुखेडकर हे संगीत उद्योगात सतत नवनवीन क्रीएटीव्ह कॉन्सेप्ट्स् देणारे गाढे संगीत अभ्यासक, दिग्दर्शक व अध्यापक म्हणून परिचित आहेत. यावेळी त्यांची संकल्पना आहे 'हमारे मुकेश' ज्यात पार्श्वगायक स्व. मुकेश यांच्या स्वर्णिम गीतांचं सादरीकरण मुखेडकर करणार आहेत त्यातून फिल्मी रोमॅन्टिक, मोटिव्हेशनल, पेट्रीऑटिक, डिव्होशनल अशा लोकसंगीतावर व रागावर आधारित अनेक शैलीतील गाण्यांचा समावेश असेल. सोबतच गाणी व मुकेश यांच्याशी संबंधित दुर्लभ माहिती व गोष्टी इत्यादींनी आणखी रंजक रूप मुखेडकरांनी कार्यक्रमाला दिलंय. सोबत वाद्यवृंदही आहेच बरं का!

सदर कार्यक्रम विलेपार्ल्यातील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलातील बेसमेंट ऑडिटोरियममध्ये दि.२४ ऑक्टोबर २०२२ रोजी नरक चतुर्दशीच्या पहाटे ७.०० वाजता आयोजित केला आहे. या कार्यक्रमास सर्वांना आमंत्रण आहे. प्रवेश मूल्य ऐच्छिक ठेवलंय. यातून मिळणारी राशी 'अरविंद कलायतन' च्या नेत्रहीन कलावंताच्या उन्नतीसाठी वापरण्यात येते.

**कार्यक्रमाच्या चौकशीसाठी संपर्क साधावा :**
**अरविंद मुखेडकर -**
**९८६९६ २०५८७ / ७२०८१ ८८७१८**

GOLDEN GATE TO IIT
"Making your dreams come true since 2005"
- **Target 2024 batch for std. X students** (ICSE, CBSE, IGCSE, SSC)
- A 2 year Online/Offline/Hybrid Group Tuition Programme from May 2022
- **Tri-pillar foundation** (Tried and tested pedagogy technique!)
  - **Sound Fundamentals**: Learn the concepts & their application
  - **Sufficient Practice**: Practice over and over till you achieve mastery
  - **Skill development**: Time & stress management, fault analysis etc.
- **Selected batch of 35** Don't feel lost in the crowd anymore!
- **Mentored 400+ students** to excel in academics since 2005
- **Single programme** for JEE (Adv. + Main), BITSAT, CET & XI, XII (HSC)
- **Guidance to choose among top-notch institutes** like IIT, NIT, IISER, BITS, DAIICT, ICT, VJTI, SPCE, SPIT, DJS, KJS & many others

Our Top Scorers : 2020 Batch / Our Top Scorers : 2019 Batch



Abhishek Mungekar IIT Gandhinagar; Anokhi Mehta IIT Bombay; Mihir Dharap IIT Palakkad; Shreyas Nadkarni IIT Bombay; Om Prabhu IIT Bombay; Atharva Varde IIT Guwahati; Omkar Nadkarni IIT Madras

Our Faculty



Prof. Vinayak Antarkar B.Tech IIT Bombay — Mathematics
Prof. Manoj Karmarkar M.Tech IIT Bombay; Prof. Indraneel Naik M.Tech NIT Trichy — Physics
Dr. U.R. Kapadi Ph.D. IIT Bombay; Prof. Sudhanshu Mishra B.Tech NIT Rourkela — Chemistry

**Contact**: Mr. Prashant 7039679129/ 9004607404, Dr. Kapadi 9867244891
Prof. Karmarkar 9930198249, Prof. Antarkar 9820651068
**Address**: Golden Gate to IIT, 107/B, Hemu Arcade, Vile Parle West, Mumbai, 400056

# अमेरीकेतील बी एम एम मध्ये पार्ल्याची पताका

पार्लेकर जिथे जातात तिथे स्वत:चे वेगळे स्थान निर्माण करतात. होमिओपॅथीच्या यशस्वी डॉक्टर, लेखिका, अमेरिकेतील बृहन महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्ष व अमेरिकेत मराठी शाळा स्थापन करणाऱ्या सौ. विद्या जोशी या पक्क्या पार्लेकर आहेत.

**# विद्याताई तुम्ही मुळच्या पार्लेकर ना ?**

मी पार्ल्यातच वाढले. माहेरची मी विद्या देशपांडे. नंतर आई-वडील अंधेरीला राहायला गेले. आठवीपर्यंत पार्ले टिळक व नंतर परांजपे शाळेची आणि पार्ला कॉलेजची विद्यार्थिनी. १९९७ मध्ये चंदाबेन मोहनभाई पटेल होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय पदवी घेतली. शाळा कॉलेज दोन्हीकडेही मी सामाजिक सांस्कृतिक सर्व व्यासपीठावरती कार्यरत होते. साहित्यिक, सांस्कृतिक व सामाजिक संस्कार माझ्यात विलेपार्ल्यानेच भिनवले आहेत.



**# तुमची मुंबईतील होमिओपॅथीची प्रॅक्टिस कशी होती ?**

१९९७ ते २००७ पर्यंत विलेपार्ल्यातच मी यशस्वीपणे व्यवसाय केला. मुंबईत असताना दूरदर्शनच्या 'हॅलो डॉक्टर' मधून 'होमिओपॅथी मधील यशस्वी कारकीर्द' याविषयी प्रेक्षकांशी संवाद साधला. २००५ ला 'होमिओपॅथी एक वरदान' हे पुस्तकही लिहिले. त्याचवेळी आपण लोकांशी उत्तम संवाद साधू शकतो याची जाणीव मला झाली.

**# तुमच अमेरिकेतील वास्तव्य आणि तेथील व्यावसायिक कामाबद्दल काय सांगू शकाल ?**

मी २००७ मध्ये अमेरिकेत आले. नवीन देश, संस्कृतीशी जुळवून घेत २०१० मध्ये हेल्थकेअर ॲडमिनिस्ट्रेशन मध्ये एमबीए केलं व बोलिंग ब्रुक इमिजीएट केअर मध्ये मेडिकल प्रॅक्टिस मॅनेजर ची जबाबदारी सांभाळली. नंतर तीन वर्षे अलीव्हिओ डेंटल प्रॅक्टिस मॅनेजर म्हणून कार्यरत राहिले व आता २०१४ पासून प्रेसिडेंट ऑफ पाथ इन्साइट्स म्हणून कार्यरत आहे.

१९११ मध्ये शिकागोला बृहन महाराष्ट्र मंडळाच अधिवेशन झालं. तेव्हा मी उद्घाटन प्रसंगी नृत्य व इतर सांस्कृतिक कार्यक्रमातून भाग घ्यायला सुरुवात केली. २०१२ मध्ये मी उपाध्यक्ष झाले. पुढे वेगवेगळ्या जबाबदाऱ्या घेत व कार्यरत राहत सचिव व २०१६ पासून बी एम एम च अध्यक्षपद सांभाळते आहे. संपूर्ण अमेरिकेतील साठ महाराष्ट्र मंडळ बी एम एम च्या कक्षेत येतात. त्यातून कोविड-१' साठी हेल्पलाइन, कोविडग्रस्तांसाठी मदत कार्य, भारतातील 'पडद्यामागील कलाकारां'साठी १८००० डॉलर्स मदत निधी म्हणून पाठवणे इत्यादी कामे केली.

**# तुमच्या मराठी शाळेबद्दल फार उत्सुकता आहे.**

माझा मराठी भाषेतून व्यक्त होण्यावरती विश्वास आहे. इथल्या मराठी कुटुंबातील मुलांना



आपल्या देशाची संस्कृती, इतिहास कळावा, त्यांची नाळ महाराष्ट्राशी जोडली जावी या हेतूने २०१४ साली चाळीस मुलांसह मराठी शाळा सुरू केली. आज १४० होऊन जास्त मुले दोन शाखांमध्ये आहेत. स्टेट बोर्ड कडून हायस्कूल लेव्हलला आता मराठी फॉरेन लँग्वेज म्हणून अभ्यासायला परवानगी मिळाली आहे व तो फायदा विद्यापीठातही मिळाला आहे. तसेच भारतातील मुलांसाठी 'प्रथम' या संस्थेद्वारे मी साक्षरता मोहिमेत कार्यरत आहे.

**# बी एम एम तर्फे अजून कोणते कार्यक्रम राबवता ?**

एकजूट हा महिला सक्षमीकरणाचा कार्यक्रम आहे. तसेच गेल्या दोन वर्षापासून सहाय्य या विनानफा संघटनेच्या कामातही कार्यरत आहे. ही परदेशी विद्यार्थ्यांना मदत, मार्गदर्शन करणे, कौटुंबिक हिंसाचाराचे प्रश्न सोडवणे, बेघरांसाठी निवास सोय अशा अनेक गोष्टी संस्था करत असते.

**# नुकत्या झालेल्या बी एम एम च्या आयोजन व कार्यक्रमाबद्दल काय सांगाल ?**

दर दोन वर्षांनी होणार बृ.म.मं.च अधिवेशन यावेळी कोविडमुळे तीन वर्षांनी झालं. यात पाच हजाराहून अधिक रसिकमंडळींनी उपस्थिती लावली. न्यू जर्सी येथील अटलांटिक कन्वेक्शन सेंटरच्या पाच लाख चौरस फुटाच्या भव्य वास्तूत ११ ते १४ ऑगस्ट हे अधिवेशन भरले. मराठी व्यावसायिकांना प्रोत्साहन व शिक्षित विस्तार यासाठी आयोजित केलेल बिझनेस मीट व कॉन्फरन्स पद्मश्री डॉ. श्रीकांत दातार यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. सर्जनशीलता व वेळेनुसार बदल यावर विश्वास ठेवत विकास करणे हा प्रमुख हेतू होता. एज्युकेशन समेट म्हणजे विद्यार्थी व अमेरिकेतील विद्यापीठांना जोडणारा महत्त्वाचा दुवा. यात भारतातील 10 शैक्षणिक संस्थांनी भाग घेतला.

प्रमुख पाहुणे अमोल पालेकर व पर्सिस्टंट सिस्टीमचे फाउंडर, चेअरमन, एमडी डॉ. आनंद देशपांडे यांनी दीपप्रज्वलन करून सांस्कृतिक संमेलनाचा शुभारंभ केला. ऋषिकेश कामेरकर दिग्दर्शित प्रगत देशात टाकलेल्या पहिल पाऊल व तेथील जगताशी जुळवून घेताना होणारी तळ्यात मळ्यात अवस्था सादर करणारी नृत्य नाटिका अप्रतिमपणे सादर झाली. भविष्यातील पिढीला पूर्वजांच्या कर्तुत्वाची ओळख करून देणारा जरीपटका, थ्रिलर नाटक शाबरी, स्वररंग, जादूगार रघुवीर मॅजिक शो, डान्स

पान ६ वर




# लेव्हायजे (रसायन शास्त्राचा पितामह, ज्याला मृत्युदंडाची शिक्षा झाली) - भाग २

अँटनी लोरी लेव्हायजे हा एका फ्रेंच उमरावाच्या कुटुंबात १७४३ मध्ये जन्मला. वकिलीचे शिक्षण त्याने घेतले खरे, पण त्याला खगोलशास्त्र, भूशास्त्र आणि रसायनशास्त्र यात रस निर्माण झाला आणि त्याने संशोधन सुरू केले. अत्यंत श्रीमंत कुटुंबात जन्मल्याने त्याला कोणतीही ददात अशी नव्हतीच. त्याच्या वैयक्तिक प्रयोगशाळेमध्ये प्रयोगांसाठी लागणारी १३००० काचेची भांडी आणि उपकरणे होती यावरून त्याच्या संशोधन कार्याच्या तयारीची कल्पना येईल. त्याच्याच बॉसच्या मुलीबरोबर (मेरी अँड) त्याने लग्नं केलं (खरं म्हणजे मेरीचं लग्न एका पन्नास वर्षाच्या माणसाशी ठरवलं गेलं होतं पण त्या लग्नाला मेरीने नकार दिला म्हणून तिच्या वडिलांनी लेव्हायजेशी लग्न लावून दिले.) मेरी हुशार होती, ती लेव्हायजेला संशोधनात मदत करणे, नोट्स काढणे, इंग्रजीतून भाषांतर करणे, आकृत्या काढणे ई. गोष्टीत त्याला उत्साहाने मदत करत असे. त्याकाळी मूलद्रव्यांची नावे वेगवेगळी असत. लेव्हायजेने एकच पद्धत वापरायला सुरुवात केली पूर्वी हायड्रोजनला एक सर्वमान्य नाव नव्हते. जळणारा गॅस असं नावं होते. तसंच सल्फ्यूरिक असिडला व्हीट्रीऑल असे संबोधले जायचे. लेव्हायजेने मूलद्रव्य म्हणजे काय हे ठरवून २३ मुलद्रव्यांची यादी केली (या यादीमध्ये त्याने प्रकाश आणि उष्णता यांनाही मुलद्रव्याचे स्थान दिले होते अर्थात ही त्याची चूक होती.) प्रत्येक जळणाऱ्या पदार्थात फ्लॉजीस्टॉन हा पदार्थ असतो आणि पदार्थ जळताना तो (फ्लॉजीस्टॉन) निघून जातो असं पूर्वी लेव्हायजे तसेच इतर शास्त्रज्ञांना वाटे. उदाहरणार्थ ज्याअर्थी मॅग्नेशियम धातु जळतो त्याआधी त्यामधे असलेला फ्लॉजीस्टॉन रोजी हवेत निघून जात असला पाहिजे म्हणूनच मॅग्नेशिअम हे मूलद्रव्य नव्हे असा (चुकीचा) समज सर्वमान्य होता. हा तर्क जर खरंच असता तर जळल्यावर मॅग्नेशिअमचे (मॅग्नेशिअम जळल्यावर तयार झालेल्या पदार्थाचे) वजन कमी व्हायला हवं होतं. प्रत्यक्षात धातु जळल्यावर त्याचा ऑक्साईड बनतो हेही लोकांना ठाऊक होतं आणि कोणत्याही धातूच्या ऑक्साईडचे वजन हे मूळ धातूच्या वजनापेक्षा जास्त असायचं हे एका फ्रेंच संशोधकाने सिद्ध केले असल्यामुळे नंतर लेव्हायजेने फ्लॉजीस्टॉन संकल्पना निकालात काढली. लेव्हायजे याने ऑक्सिजन आणि हायड्रोजन हे दोन्ही मूलद्रव्ये ओळखली आणि त्यांना ही नावे पण दिली. ऑक्सीजन चा ग्रीक भाषेमध्ये अर्थ आहे ॲसिड बनविणारा. ऑक्सीजन म्हणजे ॲसिड तयार करणारा. सर्व ॲसिड मध्ये ऑक्सिजन वायू असतोच असे (चुकीचे) मत त्याकाळी होते. लॉव्हॉइजेचे सर्वात मोठे योगदान आहे ज्वलनप्रक्रीयेत ऑक्सिजनच्या भूमिकेविषयी. लेव्हायजेने उष्णता, ज्वलन आणि प्राण्यांचा श्वासोच्छवास यांच्यातला संबंध देखील सर्वात आधी ओळखला. प्राणी ऑक्सिजन घेतात आणि कार्बन-डाय-ऑक्साइड उच्छवासावाटे सोडतात हे त्याने ओळखून प्रयोगाअंती निष्कर्ष काढला की प्राणी खाण्यातून जो कार्बन घेतात त्याचा कार्बन डाय-ऑक्साइड वायू प्राण्याच्या शरीरात तयार होतो आणि तो उच्छवासावाटे बाहेर टाकला जातो.

१७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांती सुरू झाली तेव्हा, लॅव्हॉइजेने (जरी तो उमराव होता तरीही ) या क्रांतीला देशाचे राजकारण आणि अर्थव्यवस्था सुधारण्याची संधी म्हणून पाहिले क्रांतिकारी सरकारला अर्थ, विज्ञान संशोधनाचे महत्व आणि इतर बाबींवर सल्ला देत राहिला. नंतर जुन्या काळात सत्ता वापरणाऱ्या (उमरावांवर) लोकांचा रोष वाढला तेव्हा तो किंवा त्याची पत्नी ( इतर उमरावांसारखे) परदेशात पळून गेले नाहीत. नंतर क्रांती अधिकाधिक कट्टरपंथी होत गेली आणि लेव्हायजे लवकरच इतर सदस्यांसह तुरुंगात डांबला गेला. नव्या फ्रेंच प्रजासत्ताकाला त्याच्या राजेशाही भूतकाळापासून शुद्ध केले जात होते. मे १७९४ मध्ये लेव्हायजे, त्याचे सासरे, आणि इतर २६ जणांना (ते उमराव घराण्यातील असल्यामुळे) मृत्युदंड देण्यात यावा असा निवाडा झाला. लेव्हायजेने यांने आपले डोके अगदी शांत ठेवलं होतं. त्याने फाशीच्या शिक्षेबाबतचा निर्णय स्विकारला परंतु संशोधनातील काही प्रयोग अपूर्ण असल्याने फाशीची तारीख 15 दिवस पुढे ढकलावी अशी लेखी विनंती केली (एवढी त्याला संशोधनकार्याविषयी कळकळ होती) पण ती फेटाळली गेली. आयुष्याचे शेवटचे पत्र त्याने आपल्या भावाला लिहिले ज्यात असं म्हटलं की माझे आयुष्य मी आनंदात घालवले, मला आयुष्यातून खूप काही मिळाले असल्याने आणखी मागण्याची इच्छा राहीलेली नाही. मृत्युदंडाची शिक्षा मला झाली हे एका अर्थाने बरंच झालं कारण या शिक्षेमुळे मला वार्धक्याचा तरी त्रास सहन करावा लागणार नाही. पण माझ्या कुटुंबासाठी मी काही करू शकलो नाही याचं मला वाईट वाटतं. मी तुला किंवा आपल्या जवळच्या कुणासाठी काहीही देऊ शकत नाही

अखेरीस, लेव्हायजेचा गीलोटीन मशीनद्वारे त्याचा शिरच्छेद करण्यात आला. (त्यावेळीही तो शांत होता एवढेच नव्हे तर तो मृत्युदंडाची शिक्षा झालेल्या त्याच्या नातेवाईकांना त्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत धीर देत होता.)

मृत्युदंडानंतर शंभर वर्षांनी लेव्हायजेचे संशोधनात योगदान लक्षात आल्यावर त्याचा पुतळा पॅरिसमध्ये उभा करण्यात आला. त्याचं खूप कौतुकही झालं पण तो पुतळा त्याचा नव्हताच असं काही लोकांच्या लक्षात आलं मग ज्या शिल्पकाराने तो पुतळा केला होता त्याची कसुन चौकशी करण्यात आली तेव्हा घाबरून शिल्पकाराने कबुली दिली की त्याच्याकडे एक मुंडके तयार असल्यामुळे होते ते लेव्हायजेच्या पुतळ्याच्या धडाला लावून दिले. लेव्हायजेचा मृत्युला बरीच वर्षे झाल्यामुळे कोणालाही ते कळणार नाही असं त्या शिल्पकाराला वाटलं होतं. लेव्हायजेच्याविषयी जोसेफ लॅगरांच हा सुप्रसिद्ध गणितज्ञ म्हणाला 'लेव्हायजेचे डोके धडापासून वेगळे करायला जरी एक सेकंदही लागला नाही तरी असं डोकं पुन्हा शंभर वर्षातही तयार होणे शक्य नाही.'



**डॉ. यु. आर. कापडी**
९८६७२ ४४८९१
( Golden Gate to IIT, Vile Parle)



प्रकाशनपूर्व नोंदणी सुरू!

पुरातत्त्व व इतिहास अभ्यासक लेखक
संदीप दहिसरकर लिखित

**पारले: ज्ञात-अज्ञात**

प्रकाशक : सहित प्रकाशन

पारले पूर्व, जुहू व मुंबई शहराच्या इतिहासावर आधारित तसेच त्या संबंधित १०० हून अधिक रंगीत छायाचित्रे, ९२ जुनी व दुर्मीळ छायाचित्रे, ४७ ऐतिहासिक दस्तावेज व २७ रेखाचित्रांचा एक अमूल्य संग्रह !

पुस्तकाची मुळ किंमत ₹१०००
३० नोव्हेंबर २०२२ पर्यंत ₹ ७५० या सवलतीच्या दरात उपलब्ध.
टपाल सेवेसाठी ₹ ५० अधिक आकारले जातील.
वाचकांना पुस्तक ३० नोव्हेंबर २०२२ नंतर उपलब्ध होईल.

७०३०९९००८१

Google Pay PhonePe
९९६०३७४७३९

तुमचे Investment आणि Insurance विषयीचे प्रश्न आम्हाला ई-मेल करा.

Email: expert.talks@parlebazaar.com

- Life Planning
- Life Insurance
- Child Education
- Lifetime Income
- Health Insurance

**Arvind Prabhu**

Insurance and Wealth Engineer ™
Licentiate Insurance Institute of India

Agencies: LIC, TATA AIA
B.E., PG Software Tech, MBA HR, CQA
Fellow IOD, EC LUGI, Angel Invest ALR

9967632222
drarvindprabhu@gmail.com

Scan QR Code for Q&A related to Finance and Investment

# नृत्य हेच जीवन

विलेपार्ल्यातील उभरती नृत्यांगना तसंच नृत्य शिक्षिका, सौ. वैशाली धनेश पोतदार. बालपण मुंबईतच गेलं. वडील कै. श्री विश्वनाथ सदाशिव वैशंपायन यांच्या शेतीच्या आवडीमुळे वैशालीच्या बालपणीच सारं कुटुंब मुंबई सोडून रत्नागिरीला स्थायिक झालं. तिथे आंबा, नारळ वगैरे कलमांची बाग केली. त्याशिवाय शेतीतले प्रयोग चालत असत. आई श्रीम. स्नेहल विश्वनाथ



वैशंपायन सेल्सटॅक्स मध्ये नोकरी करीत असत. वैशाली मुंबईत असताना भरतनाट्यम नृत्य शिकत होती. रत्नागिरीत जवळपास भरतनाट्यम शिक्षणाची सोय नव्हती. आवड असल्याने नृत्य तर शिकायचंच होतं. त्यामुळे कथक नृत्य शिकायला सुरुवात केली. प्रशिक्षण पद्धती थोडी पारंपारिक होती. पण तिकडे लय-तालाचं काम खूप छान शिकायला मिळालं.

बारावीपर्यंतचं शिक्षण रत्नागिरीत झालं. तोपर्यंत कथकच्याही पाच परीक्षा झाल्या होत्या. पुढचं शिक्षण नृत्यातच करायचं हे नक्की होतं. वडिलांचा खूप पाठिंबा होता. पुढचं शिक्षण कुठे घ्यायचं याचा विचार चालू असताना पुणे येथील ललित कला केंद्राविषयी माहिती कळली. पुणे युनिव्हर्सिटीला संलग्न असलेल्या केंद्रातून कथक नृत्य प्रकारात ग्रॅज्युएशन (बीए) करायचं ठरलं. तिथे ऑडिशन आणि लेखी परीक्षा होऊन सिलेक्शन झालं. आधी नृत्य शिक्षण झालं असलं तरी ते वेगळ्या प्रकारचं असल्याने ललित कला केंद्रातील वैशालीच्या प्रशिक्षणाची सुरुवात जणू प्रथमच शिकायला उभी राहत आहे अशी झाली. अगदी पहिला 'ता' चा पाय मारण्यापासून संपूर्ण वेगळ्या रीतीने शिकावं लागलं. सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स असल्याने नाटक, कथक आणि भरतनाट्यम नृत्य, संगीत.. गायन आणि वादन, हे आणि संपूर्णपणे कलांशी निगडित विषय. खूप वेगळ्या पद्धतीचा अभ्यासक्रम. नाटक, नृत्य, गायन, या कलांचा इतिहास, वेदकालीन वाद्य, संगीत, अगदी साम संगीतापासून शिकायला मिळालं. रामायण-महाभारत ही महाकाव्यं, मराठी, हिंदी, संस्कृत, इंग्रजी या चारही भाषा, नृत्यातील तोड्यांची नोटेशन पद्धती, शिवाय मीडिया ज्यात कॅमेरा, वेगवेगळ्या नृत्यांतील फरक, हेही सगळं अभ्यासाला होतं. असा नाटक, नृत्य, गाणं या सगळ्याचा अत्यंत उत्तम अभ्यास केला. ही थिअरी.

प्रॅक्टिकलला एक वेगळा विषय घ्यावा लागे. वैशालीला नाटकांची आवड आहे. त्यामुळे तिने नाटक हा विषय घेतला होता. केंद्रात ठराविक वर्ग पद्धती नव्हती. कुणीही कुठल्याही वर्गात जाऊन लेक्चर ऐकू शकत असे. कधी पारावर, कधी ओपन थिएटर मध्ये, असं कुठेही शिक्षक म्हणतील तिथे क्लास होत. घड्याळी एक तास नव्हता. दोन दोन तास लेक्चर्स चालायची आणि मुलं एन्जॉय करायची. कधी कधी शिक्षक अख्खा वर्ग घेऊन नाटकाला जायचे आणि म्हणायचे, की यातून तुम्हाला काय कळलं, काय मिळालं, ते लिहा. असे प्रॅक्टिकल अभ्यासही असायचे. सर्व बाजूने अभ्यास झाला त्यामुळे व्यक्तिमत्व संपन्न झालं. साऱ्या कला एकसंध असतात. त्या एकमेकींपासून वेगळ्या करता येत नाहीत. तिथे वेगवेगळी वर्कशॉप्स ही अरेंज होत असत. वैशालीने नाटकाचं बॅकस्टेज खूप केलं. हळूहळू शिक्षक तिला मुलांना नृत्य बसवायला सांगू लागले. शिक्षणाबरोबर शिकवण्यालाही खूप वाव होता. वैशालीतल्या नृत्य शिक्षिकेची सुरुवात तिथूनच झाली.

**गुरुकुल**

ललित कला केंद्रामधून बी.ए. पूर्ण झाल्यावर तिथूनच एम.ए. ला ॲडमिशन घेतली. आता सगळेच विषय नृत्य विषयक आणि अधिक खोलात जाऊन होते. सौंदर्यशास्त्र, नृत्याचा इतिहास वगैरे. तिथेच मंथन ही ॲक्टिव्हिटी होती. जेवढे विद्यार्थी नृत्य शिकत असत त्या सर्वांनी मिळून कॉलेजमध्येच एक प्रोग्रॅम करायचा. म्युझिशियन्सही कॉलेज मधलेच घ्यायचे. शिवाय कोरिओग्राफी असायची. पहिल्या वर्षाला सोलो दुसऱ्या वर्षाला ग्रुप कोरिओग्राफी. आपल्याच क्लासमधल्या मुलींना गोळा करून, संगीत तयार करून वगैरे. स्फूर्ती, पृथ्वी, जाळे असे विषय असत. त्या त्या काळाला अनुसरून.

नृत्य हे गुरुकुल पद्धतीने गुरूंच्या घरी जाऊन शिकायचं असे. त्यासाठी गुरु ललित केंद्रातूनच निश्चित होत. वैशालीसाठीच्या गुरु अमलाताई शेखर या ललित कला केंद्रामधूनच निश्चित झाल्या. बीए, एमए दोन्ही वर्षांकरता. थियरी



अभ्यासक्रम दिवसभर कॉलेजमध्ये. संध्याकाळी प्रॅक्टिकल अमलाताईंच्या क्लास मध्ये. वैशालीने एमए. पूर्ण होत आल्यावर पुण्यात स्वत:चे नृत्याचे वर्ग सुरू केले. ललित कला मध्ये प्रवेश घेतल्यानंतर मनात निश्चित झालं होतं की नाटक आणि नृत्य हेच आपलं कार्यक्षेत्र. एम. ए. नंतर श्रीम आभा वांबुरकर, (नृत्य गुरु पंडिता श्रीम. रोहिणी भाटे यांच्या शिष्या), यांच्याकडे पुढचं शिक्षण सुरू झालं. त्यांच्याकडून गांधर्व महाविद्यालयाच्या विशारद आणि अलंकार परीक्षा दिल्या. ललित कला आणि गांधर्व मध्ये फरक आहे. ललितच्या अभ्यासक्रमात गायन, वादन, नाटक या कलांचाही समावेश होतो. पण आवड म्हणून शिकणाऱ्या मुली बहुधा गांधर्वच्या परीक्षा देतात, जो अभ्यासक्रम मुख्यत: नृत्यावर आधारित आहे. आपल्याला याच क्षेत्रात करिअर करायचं आहे हे ठरवल्यामुळे तोही अभ्यासक्रम केला.

श्री धनेश पोतदार इंजिनिअरिंग करून ललिता कला केंद्रात नाटक विषय घेऊन बीए करायला आले होते. त्यांच्या काही मित्रांनी मिळून कला केंद्र पुणे ही संस्था स्थापन केली होती. त्या तर्फे ब्रेख्तची नाटके, सतीश आळेकर सरांचं महापूर वगैरे नाटकं केली. वैशालीही या संस्थेच्या नाटकांमधून काम करत असे नाटक करता करता मैत्री होऊन तिचं प्रेमात रूपांतर झालं.



शिक्षण पूर्ण झाल्यानंतर दोघेही विवाह बंधनात अडकले. धनेश यांनी इंजीनियरिंग केल्यामुळे नाटकातील टेक्निकल गोष्टी सांभाळताना खूप उपयोग झाला. ग्रॅज्युएशन नंतर कॅमेरा हे माध्यम जास्त आवडलं. ते सिनेमॅटोग्राफर आहेत.

कॉलेजला असताना प्रोजेक्ट म्हणून वैशालीने एक लोकनाट्य केलं होतं, 'आख्यान दमयंती'. ज्याची पूर्ण कोरिओग्राफी तिने मैत्रिणी सह केली होती. ज्यात लोकनृत्य, लोकनाट्य सगळे प्रकार होते. अशी एकातून एक ललित कला केंद्रात तीन-चार नाटकांची कोरिओग्राफी केली. ती पुढे उपयोगी पडली.

ज्याला काही नवीन करायचं असेल, त्याला मुंबई खुणावते. वैशालीचा तर जन्मच मुंबईचा. त्यामुळे मुंबईचं आकर्षण होतंच. धनेश यांचं कामही मुख्यत: मुंबईतून चालायचं त्यामुळे करिअरच्या दृष्टीने तसंच मुलीच्या जन्मानंतर तिच्या शिक्षणाच्या दृष्टीने वैशाली आणि धनेश यांनी मुंबईत स्थिर व्हायचं ठरवलं. वैशालीने दोन वर्षं पार्ले टिळक इंग्रजी माध्यमाच्या शाळेत कला शिक्षिका म्हणून नोकरी स्वीकारली. शाळेतील मैत्रीण गीतांजली महाले हिच्या बरोबर चौरस अकॅडमी सुरु केली. नृत्य,

पान ६ वर



पान ५ वरून

## नृत्य हेच जीवन

चित्र, संगीत आणि नाटक एका ठिकाणी एकत्र मिळतील अशी जागा. शाळेच्या ओळखींचा फायदा झाला मुली क्लासला यायला लागल्या. बालनाट्य केलं. चौरस तर्फे छोटे छोटे गुरुपौर्णिमेचे कार्यक्रम केले. क्लास स्थिर चालू झाल्यावर शाळेची नोकरी सोडली आणि उमराव जान अदा संगीत नृत्यनाट्यासाठीची जाहिरात आली. ऑडिशन दिली. निवड झाली. मोठ्या पातळीवर एखादी निर्मिती कशी करावी याचा उत्तम अनुभव मिळाला. तिथे अभिनय आणि नृत्य दोन्ही करायला मिळालं. दिल्ली, मुंबई, लंडन येथे शोज झाले. वैशाली बरोबर तिच्या विद्यार्थिनीही होत्या. त्यांनाही छान अनुभव, exposure मिळालं. त्यानंतर येणाऱ्या मुघल-ए-आझम नृत्यनाट्यासाठी ही निवड झाली होती. पण दुर्दैवाने कोरोना मुळे सगळी उलथापालत झाली. या काळात पुण्याहूनच सगळे ऑनलाईन क्लास घेतले. गुरुपौर्णिमा उत्सवही ऑनलाइनच केला. सर्व स्थिरस्थावर होऊन वैशाली पुन्हा मुंबईत आली तेव्हा, म्हणजे ८ मार्च २०२२ रोजी एका छान प्रोजेक्टने सुरुवात झाली. शिवकल्याण राजा. आदरणीय बाबासाहेब पुरंदरे आणि लतादीदी यांना आदरांजली म्हणून श्री. विनीत गोरे यांनी दीनानाथ नाट्यगृह येथे महिला दिनानिमित्त एक कार्यक्रम आयोजित केला होता, ज्यात दीदींनी गायलेल्या गाण्यांवर वैशालीने कोरिओग्राफी केली आणि बारा मुलींसह हा कार्यक्रम सादर केला. त्यानंतर एकापुढे एक वेगवेगळे कार्यक्रम चालू आहेत. कधी सोलो तर कधी ग्रुप. नुकतीच वैशालीने आपल्या नुपूर कथक अकॅडमीची मुंबई शाखा सुरु केली आहे. त्यातर्फे साठ्ये ऑडिटोरियम मध्ये गुरुपौर्णिमा उत्सव थाटात साजरा केला. वैशालीकडे नृत्य शिकायला मुली तर येतातच. त्यांच्याबरोबर त्यांच्या आया ही आपली आवड पूर्ण करण्यासाठी नृत्य शिकायला येत आहेत आणि परीक्षाही देत आहेत. वैशालीची मुलगी मीरा पार्ले टिळक शाळेत तिसरीत शिकत आहे आणि आपल्या आईकडे नृत्य शिकत आहे. वैशाली आणि तिच्या विद्यार्थिनींना पुढील समृद्ध कारकिर्दीसाठी उत्तमोत्तम शुभेच्छा





अनुश्री क्षीरसागर
९८२०५०९७६२

पान ३ वरून

## अमेरीकेतील बी एम एम मध्ये पार्ल्याची पताका

वर्कशॉप, सोनाली कुलकर्णी व विष्णू मनोहर यांच्याशी गप्पा असा छान कार्यक्रम रंगत गेला. न्यूट्रिशियन स्पेशालिस्ट, ज्योतिषी संदीप अवचट असे अनेकविध कार्यक्रम सादर झाले. ज्येष्ठ नागरिकांसाठी उत्तर रंग व विवाहोत्सुकांसाठी रेशीमगाठी असे कार्यक्रमही आयोजित केले होते.



**# मराठी संस्कृतीचा ठेवा सांगणारे कार्यक्रम काय होते?**

नक्कीच मीना नेरूरकर संचाने सादर केलेले नाटक. दुसऱ्या महायुद्धात



रशियन अत्याचाराने निर्वासित पोलीश नागरिक भारतात आश्रयास आले. त्यातील कोल्हापूर संस्थानातील शाहू महाराजांनी ५००० स्त्रिया व मुले यांना वळीवडे गावात आश्रय दिला. हे आश्रित पुढे मित्र बनून गेले. त्याची गाथा या नाटकाने सादर केली. आमने-सामने हे लीना भागवत व मंगेश कदम यांचे नाटक लोकांनी डोक्यावर घेतले. शेवटच्या दिवशी दिंडी मिरवणूक परंपरेला अनुसरून यावर्षी शास्त्रज्ञ, हेल्थ वर्कर व अत्यावश्यक कामगारांना मानवंदना दिली गेली. मराठी रंगभूमीची वाटचाल सांगणारे 'पश्चिम रंग पूर्व रंग', 'माणिक मोती' हा भक्ती संगीताचा कार्यक्रम, नृत्य नाट्य स्पर्धा, शंकर महादेवन यांच गायन, बी एम एम मराठी शाळेतील मुलांचं तथास्तु हे सादरीकरण असे एकाहून एक वरचढ कार्यक्रम तर रंगलेच. पण महाराष्ट्राची ओळख असलेल्या ढोल ताशाने नादरंग हा उत्सव घडवला. अमेरिकेतील दहा शहरातून आलेल्या ढोलताशा पथकांनी अटलांटिक सिटी परिसर दुमदुमवून टाकला.

**# अधिवेशन थाटात पार पडले आता काय भावना आहेत?**

या अधिवेशनासाठी प्रचंड परिश्रम, आयोजन करावे लागले. पण त्याचा साऱ्यांनी आनंद लुटला, काम केले व मुख्यत: आपल्या मातीच्या संस्कृतीचा झेंडा परदेशातही फडकत राहिला याच समाधान आहे. मला जे संस्कार पार्ल्यात मिळाले त्याचा परिपाक मला पुढील पिढीला ज्ञात करून देता आला याच समाधान आहे.

संगीता बेहेरे
९८६७७५८३१०



# होनी बाय

पार्लेपुराण

होनी बाय चे मूळ नाव काय माहीत नाही. कुणाला वाटायचं ती होनावर वरून आली म्हणून तिचं नाव होनी बाय पडलं कुणी म्हणायचं तिला गावाठाणातले बाय म्हणायचे पण अश्या बाय खूप म्हणून कुणी तरी होनी बाय म्हणून नामकरण केलं. ती होती वयस्क जाणती. अश्या वयाच्या लोकांच्या मुखी राम नाम असत शक्यतो. पण होनी बायच्या मुखात कायम विडी असायाची. विडीचं व्यसन कमी पडेल म्हणून काय बरोबर कायम खायच्या पानांची चंची असायची. तोंडात विडी नसेल तेंव्हा ती पान चघळत असायची. ती हसायची तेंव्हा तिच्या हिरड्या दिसायच्या आणि उरले सुरले वाकडे तपकिरी दात. ती कुणबी होती असं घरचे सांगायचे. दणकट बांध्याची. चोळी घालायची नाही पण साडी लपेटून घ्यायची घट्ट. त्यातून तिचे मोठाले दंड हात दिसायचे. जणू काही शिसाच्या पेन्सिलचे वरचे पूर्ण लाकूड तासून काढले आणि फक्त शिस राहिले तर कसे दिसेल तसे तिचे दंड हात आणि पाय दिसायचे. साडी घट्ट गुडघ्यावर बांधून घ्यायची. काळी चकचकीत कांती अगदी मुडदुश्या सारखी पण काळी भोर. तिच्या अंगात तेल भरपूर होत ते अंगावर दिसायचं. तिचा तो अवतार आम्हाला भिववण्यासाठी पुरेसा होता. असं म्हणतात की हे कुळबी लोक हिंडीबाचे वंशज आणि तिला पाहिलं की खात्री पटायची. ताकद प्रचंड होती तिच्यात भीती वाटण्या इतक्की. एकदा खेळताना चुकून तिच्या घराजवळ गेलो. खेळताना कळलं नाही पण चुकून तिच्या घराच्या अंगणात पोहोचलो. बरोबर लहान मुले होती. माझ्या पेक्षा लहान. मीच काय तो मोठा. ओसरीवर दचकाव तशी तिची सावली दिसली. सावली नव्हती. तिच होती. खुणेने बोलावत होती. बाकीची मुलं भेदरली. मीच मोठा त्यामुळे मनातील भीती लपवत गेलो तिच्या जवळ. तिच्या उजव्या हातात सोललेले संत्र होते. ते तिने माझ्या पुढे धरले. खेळून तहान लागली होती. म्हणून संत्र घ्यावस तिच्या हातातून असं वाटल. संत्र घेतलं. तेवढ्यात काय झालं कळलं नाही नीट. कळलं पण उशीराने. तिच्या उजव्या हातात सोललेल्या संत्र्यांच्या साली होत्या त्या तिने माझ्या डोळ्यांत जोरात पिळल्या.ह्या बेसावध पणीच्या हल्ल्याने मी एकदम भेदरलो. जोरात रडू लागलो. इतर मुलं पळाली.मला रडताना बघून होनी बाय असुर हसली. त्यातही तिच्या घट्ट हिरड्या आणि तपकिरी अर्धे पडके दात दिसले. हाग्या घाबरलो. आणिक थांबलो असतो तर तिच्या जबड्यात मला धरले असते तिने. अर्धवट मिचमीच्या डोळ्याने धूम पळालो तो अगदी घरी येऊनच थांबलो. कुणाला काही सांगायची बिशाद नव्हती.छाती उर धडधडत होत.पुढे कित्येक रात्री दचकून उठत होतो. निद्रानाश का काय ते लागलं होत मागे ते सुद्धा या लहान वयात. होनी बायची भीती मनात आधीच होती ती आता प्रचंड वाढली होती. खेळताना चुकून सुद्धा तिच्या घराच्या परीघात फ़िरकत नव्हतो. एकदा असाच खेळत होतो बरोबरच्या मुलांबरोबर. चप्पल काढून अनवाणी पायाने खेळत होतो. खेळ रंगात आला होता आणि अचानक पायाला काहीतरी टोचल. प्रचंड दुखू लागलं. तसाच खेळत राहिलो पण दुख वाढली. डोळ्यांत पाणी येऊ लागलं. तसाच लंगडत घरी गेलो. काटा जोराचा ठसा ठसत होता. आईला बघून रडू फुटल वेगाच. आई पायाताला काटा काढू पहात होती पण मी थडथडत होतो. आणखी दुखेल म्हणून पाय झाडत होतो. भोकाड पसरत होतो. आई हतबल होत होती नाजूक हाताने काटा काढू पहात होती. इतक्यात कुठल्या तरी दणकट हाताने माझा पाय घट्ट धरला. इतक्या वेळ काट्याच्या दुखण्यात माझं लक्ष नव्हतं पण बघीतल तर ती



होनी बाय होती. काट्याचा नायटा होणार आता मी भेदरलो प्रचंड. पण होनी बाय मला घट्ट धरून राहिली. काटा रुतलेला होता पायात त्या बाजूची चामडी तिने दोन बोटाच्या चिमटेत घट्ट दाबली आणि तिच्या काळकुट नखाने काटा खचंच करुन ओढून काढला. काटा काढलेल्या जागेवर लाल थेंब दिसला. थोडासा मोठा होत गेला आणि मग थांबला. होनी बाय तळहातावर काटा नाचवत होती. हिरड्या अर्धेच तुटके दात दाखवत हसत होती. आईने तिला काळा चहा दिला. ती फुर फुर करुन चहा ओढत पित होती. मनाचा गोंधळ झाला होता. त्या दिवशीची होनी बाय खरी की आजची होनी बाय खरी. मेंदूला काही कळतच नव्हते. होनी बायने विडी शिलगावाली. विडीचा वास सर्वदूर पसरला. मला खकाण्या खोकल्याची उबळ आली. मला खोकताना बघून ती खदखदुन हसली. मी धूम पळालो पण पळताना मला कळलं होनी बायची नजर माझा पाठलाग करीत असणार. या वेळी पहिल्यांदाचं होनी बाय असुरी न वाटता दूरच्या का होईना पण कुणा आजीसारखी वाटली.



सी.ए.केदार अनंत साखरदान्डे
९८३३४ ७७२३३





# रंगुनी रागांत साऱ्या

## राग भैरव, अहीर भैरव,

हा एक खूप जुना आणि प्रचलित राग आहे. प्रात:काळी गायला जाणारा भक्तीरसाने परिपूर्ण असा राग. भैरवपेक्षा अहीर भैरव जास्त प्रसिद्ध आहे. याला दक्षिणेत चक्रवाक असे म्हणतात. कदाचित त्याच्या गोलाकार चलनामुळे असेल. कोमल रिषभ (रे ) हा या रागाचा महत्त्वाचा सूर आणि त्याची ओळख. हा सातही सूर असल्यामुळे संपूर्ण राग. कोमल रिषभ (रे) तसा इतरही बऱ्याच रागात वापरला जातो, उदाहरणार्थ तोडी वगैरे. हा स्वर या रागाला गंभीर प्रकृतीचा बनवतो.

'अलबेला सजन आयो रे' ही चीज हे या रागाचे चपखल असे उदाहरण. संगीत दिग्दर्शकांनी या रागाकडे तसे दुर्लक्षच केले आहे. मला आवडलेले लक्षण गीत म्हणता येईल असे गाणे म्हणजे 'तीर्थ विठ्ठल श्रेत्र विठ्ठल.' भीमसेनजींचा जोरदार आवाज आणि तो भजनी ठेका. या अभंगातल्या नामदेवाला जसा विठ्ठल 'सापडला' तसाच हा अभंग ऐकणाऱ्या सर्वांना तो सहज सापडतो.

पूर्वी मराठी मन उचंबळून यायला दोन गोष्टी पुरेशा होत्या. एक तर बाळासाहेबांची दसरा सभेतील 'जय महाराष्ट्र 'अशी गर्जना आणि दुसरी भीमसेनांची ही विठ्ठलाची देवपूजा. सकाळी हे गाणे रेडियोवर ऐकल्यावर कोणीही सहज सश्रध्द वारकऱ्यासारखा मनात डोलू लागायचा. हल्ली बाळासाहेब आणि भीमसेनजी दोघेही स्वर्गात खुद्द विठ्ठलाच्या चरणी रुजू आहेत आणि भीमसेनजींच्या जवळपास जाणारे अजून जन्माला आले नाहीत, त्यात रॅप वर अहीर भैरव जमत नसल्यामुळे एकूणच मराठी मने थंडगार आहेत.

असेच आणखी एक या रागातील गाणे म्हणजे अभिषेकी बुवांचे 'हरी भजनाविण काल घालवू नको रे '. बुवांच्या खाजगी मैफिलीत नेहमी फर्माईश येणारे गाणे. या गाण्यांना तुफान लोकप्रियता लाभण्याचे महत्त्वाचे कारण हा अहीर भैरव राग आहे हे माझे वैयक्तिक ठाम मत आहे. गाण्याचा आशय आणि राग यांचा असा मिलाफ क्वचितच बघायला मिळतो.

काही जुन्या हिंदी संगीतकारानी हा राग खूप परिणामकारकरित्या वापरला. मन्ना डेंचे 'पूछो ना कैसे मैने रैन बिताई' हे गाणे

पान ८ वर

पान ७ वरून

## रंगुनी रागांत साऱ्या

आठवतयं ? इथे सुद्धा रागाचे सूर, दिवसाची वेळ, गाण्याचा गाभा हे सर्व एकदम फिट बसत. गाणे सुपरहिट. याच रागावर आधारित 'राम तेरी गंगा मैली' हे गाणे अर्थात काही वेगळ्याच दृश्यामुळे प्रसिद्ध झाले. असो.

एक गाणे सर्वांच्या परिचयाचे असेल. जागते रहो मधील शेवटचे 'जागो मोहन प्यारे'. सलिल चौधरी यांनी सकाळची वेळ आणि गाण्याचा गंभीर आशय समजून भैरव राग निवडला असावा. या चित्रपटाचा हा शेवट अतिशय परिणामकारक होतो. इथे सकाळचा आणि शेवटी असूनही भैरवी न वापरता भैरव वापरला कारण भैरव म्हणजे सुरुवात तर भैरवी ही शेवटी संपताना वापरतात. चित्रपटाच्या शेवटी ही एक नवी पहाट, सुरुवात दाखवचे होते म्हणून भैरव.




मिलिंद जोशी
९८१९७ ९७२५८












मनोरंजन विश्व

# सहेला रे




अक्षय बर्दापूरकर, प्लॅनेट मराठी प्रस्तुत, मृणाल कुलकर्णी दिग्दर्शित 'सहेला रे' हा चित्रपट १ ऑक्टोबर रोजी प्लॅनेट मराठी ओटीटीवर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या वेबचित्रपटात मृणाल कुलकर्णी, सुबोध भावे आणि सुमित राघवन यांच्या प्रमुख भूमिका आहेत. 'काही नात्यांना नाव नसतं', अशी टॅगलाईन असलेल्या या वेबचित्रपटात मैत्रीच्या पलीकडचे एक संवेदनशील नाते पाहायला मिळणार आहे. काळाच्या विळख्याआड हरवून गेलेल्या 'ती' च्या अस्तित्वाला मैत्रीच्या हळुवार झुळकीने पुन्हा जिवंत करून, एक नवीन संजीवनी देणाऱ्या 'ती' च्या आयुष्याची कथा सांगणारा चित्रपट म्हणजे 'सहेला रे'. या चित्रपटाचे दिग्दर्शन मृणाल कुलकर्णी यांनी केले आहे.

मृणाल कुलकर्णी त्याविषयी म्हणतात, 'परिस्थितीमुळे आयुष्याच्या परिघापलीकडे लोटली गेलेली माणसे जेव्हा पुन्हा आयुष्यात परततात, तेव्हा होणारी मनाची चलबिचल एका क्षणात भूतकाळात नेऊन उभी करते आणि त्यातूनच मग तिला तिचा स्वत:चा शोध लागतो. नात्यातील परिपक्वता यात अधोरेखित करण्यात आली आहे. हा एक कौटुंबिक चित्रपट असून तो वास्तववादी आहे.'

'प्लॅनेट मराठी'चे प्रमुख, संस्थापक अक्षय बर्दापूरकर म्हणतात, ''वैविध्यपूर्ण कथा प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्याचा आमचा प्रयत्न असतो. अशीच एक संवेदनशील, परिपक्व नात्याची कथा असलेला 'सहेला रे' आम्ही प्रेक्षकांसाठी घेऊन आलो आहोत.'' आयुष्यात कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडताना एकमेकांना गृहीत धरता धरता नात्यातील हरवून गेलेला गोडवा पुन्हा मिळवण्यासाठीची 'ती'ची धडपड या चित्रपटातून पाहता येईल. या धडपडीत तिला तिचे अस्तित्व गवसेल का, याचे उत्तर 'सहेला रे' पाहिल्यावरच मिळेल. या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन या सर्व जबाबदाऱ्या मृणाल कुलकर्णी यांनी सांभाळल्या आहेत.

# हर हर महादेव




झी स्टुडिओज आणि दिवाळी यांचं एक अतूट नातं आहे. दरवर्षी दिवाळीच्या निमित्ताने एखादी चांगली कलाकृती प्रेक्षकांसमोर आणण्यात ते यशस्वी झाले आहेत. यावर्षीची दिवाळी आपल्यासाठी खास असणार आहे. यावर्षी तर 'हर हर महादेव' हा विशेष नजराणा त्यांनी प्रेक्षकांसाठी आणला आहे. याशिवाय केवळ मराठीतच नाही तर हिंदी, तामिळ, तेलगु, मल्याळम आणि कन्नड या भाषांमधूनही हा चित्रपट एकाच दिवशी भारतभर प्रदर्शित होणार असल्याने हा चित्रपट तमाम भारतीयांसाठी दिवाळीची विशेष भेट ठरणार आहे. झी स्टुडियोजची निर्मिती असलेल्या आणि अभिजित देशपांडे यांच्या दिग्दर्शनाने सजलेल्या 'हर हर महादेव' या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांच्या मनात प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. हरहुन्नरी अभिनेता सुबोध भावे चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारत आहेत. हर हर महादेव' या चित्रपटात शरद केळकर हा अभिनेता बाजीप्रभू देशपांडेंची करारी व्यक्तिरेखा साकारताना दिसणार आहे.

'हर हर महादेव' ही केवळ गर्जना नव्हती तर ती छत्रपतींच्या स्वराज्यासाठी लढणाऱ्या मावळ्यांचा महामंत्र होता. समोरचा गनिम कितीही शक्तिशाली असो त्याला सळो की पळो करुन सोडण्यासाठीची उर्जा निर्माण करणारी, मावळ्यांना नवी उमेद देणारी शिवगर्जना म्हणजे 'हर हर महादेव'. हाच 'हर हर महादेव'चा महामंत्र जपत बाजीप्रभू देशपांडे यांनी सिद्दी जौहरच्या सैन्याविरुद्ध घोडखिंड लढवली आणि आपल्या प्राणाची आहूती देत घोडखिंड पावन केली. बाजीप्रभूंच्या याच लढवय्या करारी बाण्याची गाथा अतिशय भव्य दिव्य स्वरुपात 'हर हर महादेव' या चित्रपटात दिसणार आहे. 'हर हर महादेव' या चित्रपटाला हितेश मोडक यांचे संगीत असून यातील 'बाजी रं बाजी र झुंजार बाजी रं' हे गाणं गीतकार मंदार चोळकरने लिहिलं असून ते मनिष राजगिरेने गायलं आहे. तर शीर्षक गीत 'हर हर महादेव' हे मंगेश कांगणेने लिहिलं असून ते गाणं सुप्रसिद्ध गायक शंकर महादेवन यांनी गायलं आहे. हे गाणं तालवादक शिवमणी यांच्या तालवादनाने सजलं आहे. याशिवाय दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील गायनाच्या दुनियेतला आजच्या घडीचा लखलखता तारा सिद श्रीराम या चित्रपटाच्या निमित्ताने पहिल्यांदाच मराठी चित्रपटात गाणं गात आहे.

अभिनेते सुबोध भावे सांगतात, ''आपण जेव्हा एखाद्या खूप प्रसिद्ध अशा देवळामध्ये जातो तेव्हा आतमध्ये जाऊन देवाचं दर्शन घेण्याचा प्रयत्न करतो. ते दर्शन प्रत्येकालाच हवं तसं मिळत नाही, कारण ही भक्ताची नाही तर परमेश्वराची इच्छा असते आणि त्या इच्छेनुसारच तो प्रत्येकाला दर्शन देतो असं मला वाटतं. छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेबाबतही मला असंच वाटतं. माझी इच्छा होती म्हणून मला ती भूमिका मिळाली असं नसून मी ती भूमिका करावी ही कुठेतरी महाराजांची इच्छा असेल आणि त्या इच्छेतूनच ती मला मिळाली असं मी मानतो. महाराजांच्या या इच्छेला आणि या भूमिकेलाही पूर्णपणे न्याय देण्याचा मी प्रयत्न केलाय तो प्रेक्षकांना आवडेल अशी आशा आहे.'' 'हर हर महादेव' या चित्रपटात सुबोध भावे आणि शरद केळकर यांच्यासह अभिनेत्री अमृता खानविलकरही एका विशेष भूमिकेत दिसणार आहे. सुनील फडतरे यांच्या श्री गणेश मार्केटिंग एन्ड फिल्म्स तसेच झी स्टुडियोजची निर्मिती असलेला हा चित्रपट २५ ऑक्टोबरला भारतभरात प्रदर्शित होणार आहे.



गणेश आचवल
९८२१२६८३९१



# हॅन्सीऍटीक संघ

देशोदेशी

तुम्ही जर युरोपिअन युनियनच्या वेब साईटला भेट दिलीत तर तुम्हाला तिथे युरोपिअन युनियनच्या निर्मितीची पार्श्वभूमी आणि त्याचा इतिहास ह्यांची संक्षिप्त माहिती दिसेल. त्यानुसार, अशी संघटना बनविण्याची कल्पना दुसऱ्या महायुद्धानंतर प्रथम मांडली गेली आणि १९५७ मध्ये झालेल्या रोमच्या करारानंतर ती प्रत्यक्षात आणण्याला वेग येऊन १९५९ मध्ये युरोपिअन पार्लमेंटची स्थापना झाल्यावर खऱ्या अर्थाने युरोपिअन युनियन कार्यरत झाली.

पण खरं तर युरोपातील देशांत आपसातील व्यापाराचं सुलभीकरण व्हावं म्हणून सर्वांनी मिळून एखादी संघटना स्थापण्याची कल्पना १२व्या शतकातच मांडली गेली होती आणि जवळ-जवळ २०० वर्षं अशी संघटना प्रत्यक्षात येऊन यशस्वीपणे कार्यही करत होती.

अर्थात नॉर्वेतील बर्गेन गावात ३ दिवस पडाव टाकण्याआधी मलाही त्याची बिलकुल कल्पना नव्हती.

हेलसिंकीहून बर्गेनला पोचल्यावर आम्ही पहिली गोष्ट जर कुठली केली असेल तर हॉटेल मध्ये बॅगा टाकून बर्गेनच्या फेरी व्हार्फ कडे धाव घेतली. तिथल्या एका उपाहारगृहात मिळणाऱ्या सामन माशाची कीर्ती आम्ही ऐकून होतो. आणि तसंसुद्धा नॉर्वेत आल्यावर नॉर्वेजिअन सामन न खाण्याचं महापाप तुमच्या हातून घडलं, तर देव सुद्धा तुम्हाला स्वर्गाची दारं कायमची बंद करतो ह्याची मला जाणीव होती. (नॉर्वेच्या २०० क्रोनरच्या नोटेवर सुद्धा सामन माशाचं चित्रं आहे, इतकं त्याचं येथे महत्व आहे!!) . परमेश्वराच्या त्या प्रथमोवताराची यथाशक्ती भक्ती करून भरलेल्या पोटावर हात फिरवीत जेंव्हा आम्ही हॉटेलच्या दिशेला पावलं वळवली, तोपर्यंत गुडुप अंधार झाला होता. त्यामुळे नजीकच, त्या व्हार्फच्या पलीकडच्या रस्त्यावर ब्रिग्गेन हा ऐतिहासिक महत्वाचा विभाग आहे हे आमच्या लक्षातच आलं नाही.

बर्गेन अंगठीतल्या हिऱ्यासारखं आकर्षक शहर आहे - आटोपशीर पण डोळे दिपतील इतकं सुंदर. **पहा पहिले तीन फोटो -** १. मार्केट चौक आणि त्यातील नॉर्वेजियन वाङ्मयाचा







जनक मानला जाणारा लुडविग, होलबर्गचा सरदार (Beaeron) ह्याचा पुतळा, २. नजीकचाच एक रस्ता आणि ३. फ्लोयेन टेकडीवरून दिसणारं शहराचं विहंगम दृश्य. ह्या चौकापासून जवळचं आहे ब्रिग्गेन इलाका. नॉर्वेजियन भाषेत 'ब्रिग्गेन' चा शब्दशः अर्थ आहे जहाजांचा धक्का किंवा गोदी. आजच्या बर्गेन शहराची स्थापना ही ११ व्या शतकात ही गोदी बांधण्यापासूनच झाली. त्याकाळात नॉर्वेतून सागरमार्गे होणारा व्यापार भरभराटीला आला, आणि बर्गेनचं हे बंदर त्याचं एक महत्वाचं केंद्र बनलं. त्यामुळे त्याच्या अवतीभवती लोकसंख्याही झपाट्याने वाढली. हा व्यापार आणि त्याला पूरक सुविधा - बंदर-धक्के, गोदामं, रस्ते इत्यादी ब्रिग्गेनच्या परिसरात भराभर बांधले गेले. **पहा चौथा फोटो.**



ह्या फोटोत ज्या आकर्षक, रंगीबेरंगी इमारती दिसत आहेत (युनेस्कोच्या World Heriteage Sites च्या यादीत त्यांचा समावेश १९७९ साली झाला), त्यांचा उगम हॅन्सीऍटीक संघ (Hanseatic League) नावाच्या १३ व्या शतकातील एका वैशिष्ट्यपूर्ण संघटनेतून झाला आहे. त्या काळात युरोपातील व्यापाऱ्यांची सर्वात मोठी डोकेदुखी होती ती म्हणजे भू-मार्गांवरील दरोडेखोरी आणि सागरावरील चाचेगिरी. आणि बऱ्याच वेळा राजसत्तेकडे त्यांपासून संरक्षणाची मदत मागणे म्हणजे आगीतून फुफाट्यात उडी मारणे ठरत असे, कारण राजाचे सरदारच ह्या वाटमारीचे आश्रयदाते निघत. त्यामुळे प्रथम आजच्या उत्तर जर्मनीतील ल्युबेक (Lübeck) गावात सुमारे ११६० सालात त्या परिसरातील व्यापाऱ्यांनी एकत्र येऊन एक संघटना स्थापन केली. संघटनेचा मूळ उद्देश होता भाडोत्री सैनिक नोकरीला ठेवून मालाच्या ने-आणीवर होणाऱ्या डाक्यांना आळा घालणे. हीच होती हॅन्सीऍटीक संघाची सुरुवात. ह्या योजनेचं सुरुवातीचं यश बघून, भराभर सर्व युरोपभरातील गावा-गावातील व्यापारी त्यात सामील झाले. पुढची ३ शतकं संपूर्ण युरोपातील व्यापाराचं नियंत्रण ह्या हॅन्सीऍटीक संघाने केलं. त्याची व्याप्ती केवळ मालाच्या ने-आणीला संरक्षण देण्यापुरती मर्यादित राहिली नाही. संघाने स्वत:चे कायदे-कानून (व्यापारी व्यवहारांपुरते मर्यादित) आस्तित्वात आणले, स्वत:ची आपसातील राजनैतिक संबंधांची प्रणाली निर्माण केली. आपसात होणारे व्यापारी व्यवहार शुल्क-मुक्त होतील ह्याची खबरदारी घेतली. एकूणच प्रस्थापित राजसत्तेला समांतर अशी व्यापारी व्यवहारांपुरती मर्यादित पर्यायी व्यवस्था हॅन्सीऍटीक संघाने निर्माण केली. ह्या काळातील युरोप अनेक छोट्या-छोट्या राज्यांत विभागाला गेला असल्यामुळेही कदाचित असेल, पण हॅन्सीऍटीक संघाची सामूहिक आर्थिक ताकद आणि लष्करी बळ ह्यापुढे तत्कालीन प्रस्थापित राजे-रजवाडे सुद्धा नमतं घेत असत. आणि तशीच वेळ आली तर संघाच्या नियमांना आणि धोरणांना विरोध करणाऱ्या राज्यांची नाकेबंदी करून किंवा सरळ आपलं सैन्यबळ वापरून अशा चुकार राज्यांना वठणीवर आणण्यासही संघ मागेपुढे पाहत नसे. मात्र चौदाव्या शतकानंतर युरोपातील छोट्या-छोट्या संस्थानांचं एकत्रीकरण होऊन प्रबळ आणि विस्तृत साम्राज्य निर्माण होऊ लागल्यावर हॅन्सीऍटीक संघाचा प्रभाव कमी-कमी होत, त्याच्या सभासदांत फूट पडून शेवटी त्याचा विनाश झाला.

बर्गेन, ह्या हॅन्सीऍटीक संघाचं स्कॅँडिनेव्हियामधील प्रमुख ठाणं होतं. संघाच्या भरभराटीच्या काळात उत्तर सागरातून (North Sea) दक्षिण युरोपाशी होणारा सर्व व्यापार बर्गेन मधून नियंत्रित केला जात असे. आणि चौथ्या आणि **पाचव्या फोटोत** दिसणाऱ्या ब्रिग्गेनच्या रस्त्यावरील ह्या वैशिष्ट्यपूर्ण इमारती - संघाची कार्यालयं, गोदामं आणि संघाच्या सभासदांच्या उपयोगासाठी मूलत:




बांधल्या गेल्या. अर्थात त्या काळात प्रत्यक्ष बांधलेली एकही इमारत आज अस्तित्वात नाही कारण १८व्या शतकाच्या सुरुवातीला लागलेल्या प्रचंड आगीत त्यातील बहुतेक भस्मसात झाल्या. परंतु त्यानंतर काही दशकातच ह्या संपूर्ण इलाक्याचा जीर्णोद्धार होऊन आधी होत्या त्याच स्वरूपात ह्या इमारती पुन्हा उभ्या करण्यात आल्या. आज अर्थात फक्त त्यांचं बाह्य रूप हॅन्सीऍटीक संघाची आठवण करून देणारं आहे. आतमध्ये बहुतेकांचं रूपांतर दुकानं, उपहारगृह अश्या सारख्या 'टुरिस्ट ट्रॅप्स' मध्ये झालं आहे.

हॅन्सीऍटीक संघ जरी आज विस्मरणात गेला असला तरी त्या काळात वापरात आलेल्या अनेक प्रणाली, कार्यपद्धती, शासनव्यवस्था ह्यांचं प्रतिबिंब, आजच्या युरोपिअन युनियनच्या कारभारातही आपल्याला दिसतं.

असो. बर्गनच्या ह्या भेटीत फक्त जिभेचे चोचलेच पुरवले गेले आणि एक सुंदर शहर आणि नॉर्वेचे नेत्रदीपक फ्योर्ड (रिदी् म्हणजे खाडी) पाहायला मिळाले एव्हढंच नाही तर काही नवीन इतिहास शिकायलाही मिळाला, एवढं मात्र खरं. शेवटी जाता-जाता अश्याच फ्योर्डमधील मोडालेन ह्या एका छोट्या पण देखण्या गावाचा एक वानगीदाखल फोटो.





**सतीश जोशी**
९८२०२२८२७९



# वेदनामुक्ति

जन्म घेतल्या क्षणापासून आपली वेदनेशी ओळख होते. पडत धडपडत मूल मोठं होत असताना कितीतरी वेळा त्याला 'दुखतं'. पण आपण मुलांना वेदना सहन करायला शिकवतो. 'थोडंस दुखलं तरी रडायचं नाही... तू शूर बाळ आहेस न?' असे म्हटल की बिचारं बाळ रडू आवरतं कदाचित यामुळेच आपण वेदनांकडे दुर्लक्ष करायला, किंबहुना वेदनांसह जगायला शिकतो. बालपणापासून प्रौढत्वापर्यंतच्या प्रवासात वेदनांची जाणीव वाढत जाते आणि आपण वेदनांना सहप्रवासी मानायला लागतो. सांधेदुखीला तर आपण म्हातारपणाचा सोबतीच करून टाकलं आहे.

पण कधीतरी स्वत:लाच प्रश्न विचारावा- 'असं का? कशासाठी दुखण्यासोबत जगायचं? कशाला वेदनेला आयुष्याचा महत्त्वाचा भाग होऊ



द्यायचं?' ह्या प्रश्नाचं उत्तर देतात वेदनातज्ञ' (pain physicians), दुखणे कमी करून आयुष्य सुसह्य करणं हे त्यांचं लक्ष्य.

वेदना निर्माण होण्याची बरीच कारणं आहेत. Arthritis, spondylosis, slipped disc, sciatica, back pain, frozen shoulder अशांसारखे सर्वांच्या माहितीचे आजार तर आहेतच, शिवाय मज्जातंतूंचे काही विकार (neuralgias) खूप वेदनादायी असतात. Trigeminal neuralgias किंवा पीजे (नागीण) झाल्यानंतरच्या वेदना तर असहय असतात. मधुमेहामुळे वेदनामय मज्जाविकार (neuropathy) होतो. बसण्याच्या चालण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे किंवा चिकुनगुनिया, कोविड अशा आजारांनंतर सर्रास स्नायूंच्या वेदना उद्भवतात. कॅन्सरमध्ये होणाऱ्या वेदना किती दु:खदायी असतात हे तर सांगायला नकोच हल्लीच्या जीवनशैलीमुळे वयाच्या तिशी-चाळिशीतच दुखणी मागे लागू लागली आहेत.

आता तुमच्या मनात विचार आला असेल की, हे सगळे विकार बरे करण्यासाठी orthopedic doctors, neurologists, oncologists (कॅन्सरतज्ञ), अगदी physiotherapists सुद्धा असतातच. मग वेगळा pain physician कशासाठी? परंतु लक्षात घ्या की orthopedic doctors ना वेदना दूर करण्यासाठी औषध किंवा शस्त्रक्रियेचा उपयोग करावा लागतो, physiotherapy काही विशिष्ट मर्यादेपर्यंतच उपयुक्त ठरते, oncologists कॅन्सरवर उपचार करतात- वेदनेवर नाही.

वेदनाशामक औषधं अगदी थोड्या काळापुरती घेणंच योग्य असतं. ही औषधं थांबवली की वेदना परततात ते वेगळंच. कॅन्सरसारख्या काही आजारांत वेदना इतक्या तीव्र असतात की शक्तिशाली वेदनाशामकंही त्या दूर करू शकत नाहीत.




तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ टिकणाऱ्या वेदनेला chronic pain' म्हणतात. अशा वेदना माणसांच्या व्यक्तिगत व व्यावसायिक आयुष्यावर परिणाम करतात. त्यांना सामाजिक जीवन उपभोगता येत नाही तसंच कामावरही लक्ष केंद्रित करता येत नाही. चिंता, नैराश्य ग्रासून टाकतं. कधीकधी तर विशेषत: तरुणांमध्ये वेदना सहन न करू शकल्यामुळे आत्महत्येचे विचारही मनात घोळू लागतात. ह्या सर्व कारणांमुळे वेदनांवर वेळीच उपाययोजना करणं गरजेचं ठरतं.

आरोग्यशास्त्रातील 'pain management ही शाखा वेदनामुक्तीसाठी वेगवेगळ्या तंत्रांचा उपयोग करते

पाठदुखीसाठी Transforaminal इंजेक्शनं.

सांध्यांत दिली जाणारी इंजेक्शन, muscle spasms मुळे होणाऱ्या वेदनांसाठी 'dry needling' सारखे काही उपाय.

सांध्यांसाठी वापरली जाणारी Platelet-rich Plasma (PRP) सारखी regenerative thereapy जिच्यामुळे दुखावलेले cartilage पुन्हा वाढू लागते.

Radio-ferequency Ablation हे तंत्र वापरून sensory nerves जाळले जातात, ज्यामुळे वेदना दूर होण्यास मदत होते.

कॅन्सरच्या तसंच माकडहाडाच्या वेदना कमी करण्यासाठी Sympathetic Blocks चा वापर केला जातो.

हे सगळे उपचार x-ray किंवा सोनोग्राफीच्या मार्गदर्शनाखाली केले जातात, त्यामुळे पूर्णपणे सुरक्षित असतात.

वेदनामुक्तीचं शास्त्र रुग्णांवर उपचार करण्यासाठी वरील सर्व तंत्रांसोबत physiotherapy. व्यायाम व समुपदेशनाचा देखील उपयोग करते.

मग आता त्रासदायक वेदनेला तुमच्या आनंदात बाधा आणू देऊ नका. वेदनामुक्त जीवन जगा !

संपर्क: डॉ. मोहना गद्रे
९८२०४ ८८४४८
संवेदना पेन क्लिनिक, c/o जोशी पॉलिक्लिनिक
महंत रोड, रुईया हायस्कूल समोर..
फेसबुक @ Samvedana Pain Clinic
Instagram handle:



# किक बॉक्सिंगमध्ये ऋत्विकचे यश




विलेपार्ले येथील रहिवासी असलेल्या ऋत्विक देशप्रभूने ऑगस्ट २०२२ मध्ये झालेल्या वाको★★ इंडिया सिनियर्स आणि मास्टर्स राष्ट्रीय किक बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये ८१-८६ किलो वजनी गटात कांस्यपदक जिंकले. ऋत्विकने स्कल्प्ट फिटनेस आणि एमएमए, वाकोला येथे २०२१ पासून किक बॉक्सिंग खेळण्यास सुरुवात केली. त्याने प्रथम ऑगस्ट २०२१ मध्ये अल्टीमेट किक बॉक्सिंग स्पर्धेत (ठाणे जिल्हा किक बॉक्सिंग असोसिएशन) भाग घेतला आणि सुवर्णपदक जिंकले. मार्च २०२२ मध्ये झालेल्या महापौर चषक किकबॉक्सिंग स्पर्धेत (वाको ★★ मुंबई किक बॉक्सिंग असोसिएशन) ऋत्विकने पुन्हा सुवर्णपदक जिंकले. १६ जुलै २०२२ रोजी अहमदनगर येथे झालेल्या अखिल महाराष्ट्र राज्य किक बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये त्याची निवड झाली व ८६ किलोखालील गटात सुवर्णपदक जिंकले आणि चेन्नई येथे १८ ते २२ ऑगस्ट २०२२ या कालावधीत झालेल्या राष्ट्रीय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी तो पात्र ठरला. ऋत्विकने ऑगस्ट २०२२ मध्ये चेन्नई येथे पार पडलेल्या स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर कांस्यपदक जिंकले.

ऋत्विक २४ वर्षांचा असून त्याने सरदार पटेल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून इंजिनीअरिंग केले आहे. तो डेलॉइट यूएसआय येथे रिस्क अँड फिनांशियल सेक्युरिटी ऍनालिस्ट (जोखीम आणि आर्थिक सल्लागार विश्लेषक) म्हणून कार्यरत आहे. त्याने आपले शालेय शिक्षण इंडियन स्कूल मस्कतमधून पूर्ण केले आहे. शालेय स्तरावर त्याने मस्कत कम्युनिटी फुटबॉल लीगमध्ये दोन वेळा 'प्लेअर ऑफ द टूर्नमेंट' चा मान मिळवला होता. शालेय जीवनात त्यांने इंडियन सोसायटी मस्कतने आयोजित केलेल्या बुद्धिबळ स्पर्धेतही सुवर्णपदक मिळवले होते.

(★★ वर्ड असोसिएशन ऑफ किक बॉक्सिंग ऑर्गनाईझेशन, हेड क्वार्टर - इटली)




# सोनालीच्या कारकीर्दीचा रौप्य महोत्सव

मेरी आवाज सुनो या कार्यक्रमाची मेगा फायनलिस्ट आणि विजेती सोनाली भाटवडेकर कर्णिक, हिच्या संगीत कारकिर्दीचे हे रौप्यमहोत्सवी वर्ष.



स्व. लतादीदींच्या हस्ते ही ट्रॉफी सोनालीने स्वीकारली होती. या निमित्त शनिवार दिनांक २४ सप्टेंबर रोजी दीनानाथ नाट्यगृह येथे 'स्वर'स्वती या लताबाईंनी गायलेल्या गीतांवर आधारीत, सोनालीच्या एकल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध लेखक निवेदक श्री. अंबरीष मिश्र यांचे तर संगीत संयोजन झंकार कानडे आणि सागर साठे यांचे होते. सोनालीला शुभेच्छा तसेच आशीर्वाद देण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होती. सोनाली सुप्रसिद्ध शास्त्रीय संगीत शिक्षक पं. मनोहर जोशी तसेच सुप्रसिद्ध संगीतकार, गझल गायक, सुगम संगीत शिक्षक श्री. विकास भाटवडेकर यांची शिष्या आहे.

# ‘सांज’ ग़ज़ल-काव्य संग्रहाचे प्रकाशन

सुप्रसिद्ध कवी, गजलकार सदानंद डबीर ह्यांच्या ‘सांज’ ह्या आठव्या गजल-काव्य संग्रहाचे ग्रंथाली ह्या संस्थेने थाटात समारंभपूर्वक प्रकाशन सुप्रसिद्ध संगीतकार अशोक पत्की ह्यांच्या हस्ते ७ ऑक्टोबर रोजी केले.

संग्रहाची मुखपृष्ठ केली आहेत, तसेच त्यांच्या अनेक गजल, गीतांना संगीत दिलंय. देवकी पंडितांनी त्या गायल्या आहेत. मिलिंद जोशी स्वत: कवी आहेत. डबीरांचे मार्गदर्शन ते गजल लेखनासाठी घेतात. त्यांनी सुद्धा आपले मनोगत



हा दिमाखदार सोहळा वांद्रे, बँड स्टँड येथील ग्रंथालीच्या ‘प्रतिभांगण’ ह्या सुंदर सभागृहात झाला. सभागृहात नव्वद प्रेक्षकांची व्यवस्था असल्याने कार्यक्रम निमंत्रितांसाठी होता

अशोक पत्कींनी आपल्या भाषणात सदानंद डबीरांच्या भक्ती संगीताच्या कॅसेटला १९८३ साली संगीत दिल्याचे सांगितले. उत्तरा केळकर, राणी वर्मा, रवींद्र साठे, अजित कडकडे ह्यांनी त्या रचना गायल्या होत्या. अलीकडे ‘कलावैभव’ निर्मित ‘मदनरंग’ ह्या संगीत नाटकाची गाणी डबीरांनी लिहिली होती व संगीत पत्कींचे होते हा ही उल्लेख त्यांनी केला.

‘‘सदानंद डबीरांच्या रचना सहज व प्रासादिक आणि अर्थवाही असतात.त्यात ओढाताण नसते.’’ असेही पत्की म्हणाले.


संगीतकार मिलिंद जोशींनी डबीरांच्या चार व्यक्त केले.

सुदेश हिंगलासपूरकरांनी ग्रंथालीच्या उपक्रमांची माहिती दिली. सदानंद डबीरांनी आभार मानले. त्यानंतर विवेक काजरेकर, माधव भागवत, मिलिंद जोशी, मनीषा जोशी ह्या संगीतकार/गायकांनी, सदानंद डबीरांच्या गीत, गजला सादर केल्या. रक्षानंद पांचाळांची तबला साथ होती. गायनाला रसिकांची भरभरून दाद मिळाली. डबीरांनी दोन गजला वाचून सादर केल्या.

समिरा गुजर जोशींचे प्रसन्न सूत्र संचालन होते. पावसाने दमदार हजेरी लाऊन सुद्धा रसिकांची हाऊस फुल्ल उपस्थिती होती व कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# भूलोकीच्या अद्भुत यात्रा

पार्ल्यात जन्मलेले आणि पार्ल्यातच वास्तव्यास असलेले लेखक श्री आशुतोष उकिडवे हे व्यवसायाने फ्रेंच भाषेचे शिक्षक, दुभाषा व अनुवादक. वाचन, लेखन आणि प्रवास हे त्यांचे छंद. कथा, अनुवाद, बालसाहित्य, ललितलेखन, प्रवासवर्णन, साहित्य समीक्षा, भाषेवरचे चिंतनात्मक व वैचारिक लेख असे बहुपेडी, कसदार लेखन करणारे श्री उकिडवे हे मराठी वाचकांना १९९७ सालापासून परिचित आहेत. मासिके, दिवाळी अंक व वर्तमानपत्रातील सदरं यातून ते आपल्याला अधूनमधून भेटत असतात. वर उल्लेखलेल्या विषयांवरची त्यांची काही पुरस्कारप्राप्त पुस्तकेही प्रसिद्ध झाली आहेत.




नुकतंच त्यांचं आणखी एक नवं पुस्तक वाचकांच्या भेटीला आलं आहे. शीर्षक आहे ‘भूलोकीच्या अद्भुत यात्रा.’ करोनाकाळाचा अपवाद सोडल्यास, व्यवसाय व पर्यटन यानिमित्ताने त्यांचा देशोविदेशीचा प्रवास सुखनैव चालू असतो. केवळ ‘हटके’ देश बघूनच ते थांबत नाहीत तर अतिपरिचित असलेल्या देशांमधले, तिथल्या संस्कृतिमधले हटकेपण ते हुडकतात व आवर्जून त्याविषयी लिहितात. विविध दिवाळी अंक व मासिके यांमधून वेळोवेळी छापून आलेल्या ९ लेखांचा परिपाक म्हणजे सदर पुस्तक. कधी सोन्या-समृद्धीने झळकणाऱ्या दुबईचा ‘माया-बाजार’, तर कधी चितरुण रंगेल बँकॉकचा ‘काया-बाजार’; कधी ‘पेनांग-बाली-लंकावी’च्या त्रि-बेटांची नाविन्यपूर्ण सफर, तर कधी युरोपातल्या ६ मोक्याच्या देशांची वेधक बखर; कधी फ्रान्सच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा भरगच्च लेखा-जोखा, तर कधी अद्भुत मॉलदिव्जमधून फेरफटका; कधी फ्रेंच भोजनाची परिपूर्ण थाळी, तर कधी त्याच फ्रान्सच्या कोस्कवील समुद्रकिनाऱ्याची वारी... पृथ्वीतलावरची ही दिव्य कौतुके, ‘याची देही याची डोळा’ न्याहाळायचा आनंद आशुतोष उकिडवे यांचं हे पुस्तक वाचकांना देतं. याशिवाय विमानातले विशेषत: Business class मधले प्रवास आणि सप्ततारांकित हॉटेल्समधल्या वास्तव्यातले बारकावेसुद्धा वाचकांना एका वेगळ्याच विश्वात घेवून जातात.

# NAB च्या मुलांचे गिरी भ्रमण

जिजाऊ प्रतिष्ठानचे श्री चंद्रकांत साटम हे गेली दहा-बारा वर्षे 'NAB' च्या दृष्टिहीन मुलांना घेऊन शिवरायांच्या विविध गडांची ऐतिहासिक माहिती व प्रत्यक्ष गड आणि त्याची प्रतिकृती यांची कल्पना हस्तस्पर्शाने करून देतात. त्याकरिता ४० ते ४५ अंध मुले व तेवढेच उत्स्फूर्तपणे तयार झालेले स्वयंसेवक घेऊन प्रत्यक्ष गडावर चढाई करतात. धोका आहेच. परंतु स्वयंस्फूर्तीने अंगमोड व पदरमोड करून निर्विघ्नपणे चढाई पार पाडतात. याकरता 'NAB' कडून अथवा त्यांच्या मुलांकडून एकही पैसा घेतला जात नाही. उलटपक्षी दोन दिवसांच्या राहण्या - खाण्याची, खाऊ - पाण्याची व गाडी - घोड्याची व्यवस्था स्वत: साटम सरांचा परिवार व स्वयंसेवक करतात.

अशा या ट्रॅककरता कोविडच्या दोन वर्षांच्या बंदीनंतर यंदाची सहल ‘भोर’ येथील ‘रोहिडा’ (विचित्र गड) ‘रायरेश्वर’ (शिवाजी महाराजांच्या शपथ विधीचे स्थान) व ‘नागेश्वर’ येथे नेली होती. ४६ अंध विद्यार्थी व तेवढेच स्वयंसेवक होते. शुक्रवारी २३.९.२२ रोजी तीन बसेस मधून निघून शनिवारी सकाळी ‘रोहिडा गड’ करुन, जेवण व थोडा आराम करुन कूच केले व प्रत्यक्ष गडावर रात्री साडेदहा वाजता शेवटची व्यक्ती त्याच्या विद्यार्थ्याला घेऊन पोहोचले. रविवारी ‘नागेश्वर’ दर्शन करुन मुंबईत २५.९.२२ रोजी रात्री ११ वाजता सर्वजण सुखरूप पोहोचले. त्यापैकी पार्ले टिळकचे श्री सु. ज. कुळकर्णी सर व १९७७ च्या बॅचच्या सिक्सर ग्रुपचे विजय केसकर व त्यांचा परिवार उपस्थित होते. सिक्सर ग्रुपतर्फे दरवर्षी मुलांकरिता दोन दिवसांच्या खाऊ पाणी यांची व्यवस्था करण्यात येते. तसेच नितीन वालावलकर हे दरवर्षी ‘केसरी’ टूरकडून मुलांकरता रेनकोट व टोप्या यांची व्यवस्था करतात.

पार्ले BAZAAR
www.parlebazaar.com
Vile Parle's own Business Platform
Parlebazaar.com for Local Business
Grow your business by promoting it on parlebazaar.com and reach thousands of consumers at a click !
Ads options - Banners, Classifieds etc.



## GULMOHOR TRAVELS - PACKAGE TOURS

| Sr. | Dates (2023) | Destination & Attractions |
|---|---|---|
| 1. | 08 January | Popti Party - Alibaug, Narvekar Farm, RoRo Cruise |
| 2. | 15 January | Hurda Party - Alandi, Sankalp Garden |
| 3. | 22 January | Popti Party - Saralgaon, Mhaskar Farm Visawa Resort |
| 4. | 26-29 Jan. | Wadi, Khidrapur, Audumbar, Mahalakshmi, Panhala, Jotiba |
| 5. | 05 Feb. | Ukad Handi - Boranda, Kiran Lele's Rohini Krushi Paryatan |
| 6. | 07-08 Feb. | Museum Special - Deolali, Bhagur, Dubere, Sinner |
| 7. | 10-12 Feb. | Strawberry Mahotsav - Mahableshwar, Pratapgad, Wai |
| 8. | 17-19 Feb. | Maha Shivratri - Guhagar, Hedvi, Velneshwar, Anjanvel |
| 9. | 25-26 Feb. | Grape City - Nashik - Sahyadri Farms, Gangapur Lake, Sula |
| 10. | 05 March | Watermelon Festival - Manor, Shivar Agro Tourism |
| 11. | 06-07 Mar. | Holi Pournima Special - Borli Panchtan, Dive Agar |
| 12. | 24-26 Mar. | Jungle Safari - Tadoba National Park |
| 13. | 01-02 April | Ecotourism - Chandoli National Park, Vasant Sagar Lake |
| 14. | 07-09 April | Statue of Unity - Kevadiya, Garudeshwar, Poicha |
| 15. | 12-19 April | North Sikkim - Gangtok, Lachen, Lachung, Yumtang, G'mar |
| 16. | 21-23 April | Jungle Safari - Kanha National Park |
| 17. | 27-30 April | Amra Mahotsav - Devgad-Ratnagiri, Adivare, Kasheli, G'pule |
| 18. | 05-07 May | Jungle Safari - Satpuda National Park |
| 19. | 12-14 May | Amra Mahotsav - Guhagar, Hedvi, Velneshwar, Parshuram |
| 20. | 26-28 May | Amra Mahotsav - Dapoli, Kolthare, Dabhol, Murud, Anjarle |
| 21. | 02-04 June | Amra Mahotsav - Valsad, Dharampur, Daman, Silvassa |
| 22. | 09-11 June | Jungle Safari - Ranthambore National Park |
| 23. | 19-23 June | Rathotsav Special - Puri, Konark, Chilka, Bhuvaneshwar |
| 24. | 24-25 June | Varsaha Sahal - Bhimashankar, Malshej Ghat, Krishnabela |
| 25. | 08-09 July | Varsha Sahal - Pawna, Mulshi, Kolvan, Hadshi, Rutuparna |
| 26. | 22-23 July | Varsha Sahal - Shivtharghal, Varandha, Tamhini |
| 27. | 14-21 Aug. | Ladakh - Leh, Nubra, Turtuk, Pangong, Kargil |
| 28. | 26-27 Aug. | Varsha Sahal - Igatpuri, Bhandardara, Randha, Bhavli |
| 29. | 05-07 Sep. | Ecotourism - Poorna Wildlife Sanctuary, Koshmal, Mahal |
| 30. | 09-10 Sep. | Varsha Sahal - Kumbhe, Kolad, Bhira, Rawalje, Kundalika |
| 31. | 30Sep.-1Oct. | Kas Plateau, Sajjangad, Thoseghar, Chalkewadi Windmills |
| 32. | 07-14 Oct. | Manglore, Sringeri, Udupi, Murdeshwar, Jog Falls, Gokarna |
| 33. | 28-29 Oct. | Kojagiri Night - Dhepe Wada, Girivan |
| 34. | 02-05 Nov. | Malvan-Tarkarli-Devbaug, Chiwla, Redi-Aravli, Kunkeshwar |
| 35. | 22-28 Nov. | Assam-Meghalaya - Kaziranga, Shillong, Cherrapunji, Dawki |
| 36. | 01-03 Dec. | Chiplun, Koyna, Kumbharli, Sangmeshwar, Marleshwar |
| 37. | 08-10 Dec. | Hill Station - Saputara, Shabri Dham, Pampa Sarovar, Vani |
| 38. | 12-17 Dec. | Kochi, Munnar, Periyar, Alleppey, Kovalam, Kanuakumari |
| 39. | 21-24 Dec. | Pandharpur, Tuljapur, Akkalkot, Ganagapur, Siddheshwar |
| 40. | 29-31 Dec. | Dapoli, Kolthare, Dabhol, Murud, Anjarle, Asud, Ladghar |

9869002219 / 9769008775 / 9869376515 / 9769069441